# समिति दर्पण

**जून २०२६**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४५५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात आठ आणि नगरमध्ये दोन अशी दहा वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# मुलींच्या शिक्षणासाठी माता आग्रही!

## समिति वसतिगृहांतील प्रवेश प्रक्रियेदरम्यान कार्यकर्त्यांचे निरीक्षण



**समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश देताना गरीब, गरजू कुटुंबातील सदस्य या मुख्य निकषाबरोबरच अन्यही अनेक अटी- नियम पाळले जातात. विद्यार्थ्यांच्या गावात असलेल्या शैक्षणिक सुविधा, त्याचे पुण्यात उच्च शिक्षणासाठी येण्याचे कारण, अशा सर्व बाबी काटेकोरपणे तपासल्या जातात. खरा गरजू विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी काळजी घेतली जाते. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया म्हणजे समितीच्या कार्यकर्त्यांसाठी तारेवरची कसरत असते. अनेक अनुभव त्यांना येतात. वेगवेगळ्या प्रवृत्तीचे, स्वभावाचे पालक आणि विद्यार्थी भेटतात. यंदा सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेतील विशेष दखल घेण्याजोगी बाब म्हणजे मुलींच्या शिक्षणाविषयी ग्रामीण भागातील मातांची सजगता आणि आग्रह!**


**रत्नाकर मते**
विश्वस्त, अध्यक्ष प्रवेश व आर्थिक मदत उपसमिती






मागील वर्षीच्या अवलोकनांचा आढावा घेऊन पुनर्प्रवेशांची संख्या निश्चित करणे, सर्व वसतिगृहात समतोल राखण्यासाठी विद्याशाखानिहाय जागांची विभागणी करणे व त्यानंतर उपलब्ध रिक्त जागांची संख्या निश्चित करणे, अशी पूर्वतयारी झाल्यानंतर विद्यार्थी साहाय्यक समितीची सन २०२६- २७ या वर्षीची प्रवेश प्रक्रिया ५ जूनपासून समितीच्या संकेतस्थळावरील ऑनलाईन प्रवेशासाठीची लिंक उघडून सुरू करण्यात आली.

या वर्षाकरिता पुण्यातील वसतिगृहात मुलांच्या १३२ तर मुलींच्या २२३ जागा उपलब्ध आहेत. अहिल्यानगरच्या वसतिगृहात मुलांच्या ८० तर मुलींच्या वसतिगृहात २० जागा उपलब्ध आहेत. आतापर्यंत मुलांचे १७८ तर मुलींचे २३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी उपलब्ध जागा व प्रवेशाच्या निकषांनुसार ११८ मुले तर १७८ मुली मुलाखतीसाठी पात्र ठरल्या आहेत. चार प्रवेश फेऱ्यांमध्ये यापैकी ५८ मुलांच्या आणि ११० मुलींच्या मुलाखती पूर्ण झाल्या असून २१ मुले आणि ४८ मुली प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. पुढच्या दोन फेऱ्यांमध्ये ५० मुले व ५८ मुलींच्या मुलाखती नियोजित आहेत. या सर्व मुलाखतीसाठी समितीच्या कार्यकर्त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले आहे व ते सर्व कार्यकर्ते अत्यंत उत्साहाने प्रवेश प्रक्रियेत सहभागी होत आहेत. अद्याप कोणत्याही महाविद्यालयात व्यावसायिक विद्याशाखांची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली नसल्याने समितीच्या वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया १५ ऑगस्टच्याही पुढे जाण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत झालेल्या प्रवेश फेऱ्यांचा आढावा घेता कार्यकर्त्यांनी काही निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यातील महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे ग्रामीण भागातील महिला पालकांची मुलींच्या शिक्षणाबाबत असलेली सजगता आणि आग्रह. कुटुंबाचा विरोध पत्करूनही त्या आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी पुढाकार घेताना दिसतात. वडिलांचा शिक्षणाला असलेला विरोध पत्करून एक आई मुलीबरोबर मुलाखतीसाठी आली होती, तर तेंदूपत्ता जमा करून उदरनिर्वाह करणारी एकल माता मुलीला शिकवायचेच, या निश्चयाने मुलीबरोबर आली होती.

बहुसंख्य विद्यार्थी/ विद्यार्थिनी या त्यांच्या कुटुंबातील बारावीच्या पुढे शिक्षण घेणारे पहिले सदस्य असल्याचे दिसून आले. घरात आवश्यक शैक्षणिक वातावरण आणि योग्य मार्गदर्शन नसल्याने, अपुऱ्या माहितीच्या आधारे प्रशासकीय सेवांची स्वप्न घेऊन येणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. परंतु प्रशासकीय सेवा म्हणजे नक्की काय, त्यासाठी असणाऱ्या स्पर्धा परीक्षांची पुरेशी स्पष्टता, कालबद्ध कार्यक्रम यांची जाणीव अजिबात नाही. अनेक पालक मोठी फी भरून स्वायत्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतात. परंतु प्रवेशानंतर पुण्यात राहण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद त्यांच्याकडे नसते. करू काहीतरी, म्हणणारे पालकही आढळले.

या सर्व पार्श्वभूमीवर समितीच्या ब्रीदानुसार सर्वथा गरीब, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, हे खरे पुण्याचे काम करायला मिळणे, हे आम्हा कार्यकर्त्यांचे परमभाग्य आहे.

ग्रामीण तसेच निमशहरी भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठे आहे. कारण तेथील शिक्षणाचा दर्जा अत्यंत सुमार आहे आणि उपलब्ध संधीही नगण्य आहेत, असे मुलाखतीसाठी आलेल्या पालकांचे म्हणणे आहे.

# पालकांशी नाते झाले अधिक दृढ

## मेळाव्यात २५० जणांचा सहभाग, समजून घेतले समितीचे कार्य

विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्य, मूल्यव्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने समितीत दरवर्षी पालकांचा मेळावा आयोजित करण्यात येतो. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या कल्पनेनुसार गेल्यावर्षीपासून विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच हा मेळावा घेण्यात येतो. त्यानुसार यंदा १८ व १९ जून रोजी श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात अनुक्रमे मुलांच्या व मुलींच्या पालकांचा मेळावा झाला.

या मेळाव्यात दोन दिवसांत मिळून सुमारे २५० पालक सहभागी झाले. त्यातून पालक, विद्यार्थी आणि समिती व्यवस्थापन यांच्यात सशक्त संवाद झाला, पालकांशी नाते अधिक दृढ झाले. मेळाव्यात सुरुवातीला चित्रफितीच्या माध्यमातून समितीची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर कार्यकर्ते, विश्वस्त, पर्यवेक्षक आणि विद्यार्थी प्रतिनिधींचा परिचय करून देण्यात आला. समितीचे कार्य, विद्यार्थ्यांची दिनचर्या, सकाळच्या योगासनापासून रात्रीच्या पसायदानापर्यंतचे विविध उपक्रम, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम आदींची सविस्तर माहिती पालकांना देण्यात आली.

वसतिगृह उपसमितीचे अध्यक्ष दिनकर वैद्य यांनी समितीच्या कार्याविषयी माहिती दिली. तुषार रंजनकर, प्रवेश समितीचे अध्यक्ष रत्नाकर मते, विश्वस्त नंदकुमार तळेकर, श्रीमती विनया ठोंबरे यांनी पालकांशी संवाद साधला.

पालकांनी समितीच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. पाल्यांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांचा उल्लेख केला. "आमच्या मुलांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी समिती जे कार्य करते, ते अत्यंत कौतुकास्पद आहे. आमची मुले सुरक्षित, शिस्तबद्ध आणि संस्कारक्षम वातावरणात आहेत, याचा आम्हाला विश्वास वाटतो." अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. या मेळाव्यामुळे समितीच्या कामाबाबत पालकांमध्ये अधिक विश्वास निर्माण झाला असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी पालक- समिती यांच्यातील नाते अधिक दृढ झाले.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन अत्यंत शिस्तबद्ध होते. पालकांसाठी भोजनाची उत्कृष्ट व्यवस्थाही केली होती.

### व्यवस्थापनातील विद्यार्थ्यांना मान

**यंदाच्या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे व्यवस्थापनात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टेजवर बसण्याचा मान देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सहभागातून वसतिगृह व्यवस्थापन ही संकल्पना समितीत अनेक वर्षे राबविली जात आहे. व्यवस्थापन गटातील विद्यार्थ्यांचा यावेळी कार्यकर्त्यांच्या हस्ते पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी कामातील आपले अनुभव, शिकलेली जीवनमूल्ये आणि व्यक्तिमत्त्वातील बदल याविषयी भावना व्यक्त केल्या.**



### पालक प्रतिक्रिया



"पालक मेळावा छान वाटला. वसतिगृहाचा परिसर स्वच्छ आणि सुंदर आहे. समितीकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची सविस्तर माहिती मेळाव्यात मिळाली.
**विद्या नंदकुमार खालकर,** छत्रपती संभाजीनगर



"माझा मुलगा सार्थक शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शिकत आहे. समितीमध्ये अल्प दरात राहण्याची व भोजनाची उत्तम व्यवस्था आहे. येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठीही सातत्याने कार्य सुरू आहे. या संस्थेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित, शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात शिक्षण घेण्याची संधी मिळते.
- **संतोष वचकल,** वीर, ता. पुरंदर



"माझी मुलगी दिक्षा हिला नगरमधील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला, तेव्हा तिला ठेवायचे कोठे, असा प्रश्न होता. कॉलेजमधूनच विद्यार्थी साहाय्यक समितीबद्दल माहिती मिळाली. असेही कार्य करणारी संस्था आहे, हे ऐकून आश्चर्य वाटले. मेळाव्यामुळे इतर पालकांबरोबर ओळख झाली. समितीच्या कार्यकर्त्यांची समितीप्रति असलेली निष्ठा पाहून मुलगी अगदी योग्य आणि सुरक्षित ठिकाणी असल्याचा विश्वास मिळाला.
- **लक्ष्मण मोहन बांदल,** मु. पो. दादेगाव, ता. आष्टी, जि. बीड



"पालक मेळावा अतिशय नियोजनबद्ध होता. विद्यार्थ्यांशी संबंधित पालकांची कर्तव्ये काय आहेत, हे समजले. कमवा- शिका योजनेमुळे आर्थिक मदत तर होतेच, तसेच विद्यार्थी आत्मनिर्भरही होतात. समितीच्या माध्यमातून लॅपटॉप मिळाल्याने आमचा मोठा खर्च वाचला. समितीची अशी प्रगीत होवो आणि चांगले विद्यार्थी घडोत.
- **विनायक रामचंद्र लांडगे**, वडगाव कांदळी, ता. जुन्नर, जि. पुणे

यशवंत

## अमोल, दिग्विजय झाले सी.ए.


अमोल चितळकर


दिग्विजय कदम


समितीचे विद्यार्थी अमोल तुकाराम चितळकर, दिग्विजय सुनील कदम या दोघांनी सी.ए. परीक्षेत उत्तम यश मिळविले.

अमोलचे समितीच्या लजपतराय भवनमध्ये २०१६- १९ या कालावधीत वास्तव्य होते. हाकेवाडी (ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) या छोट्या गावातील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील अमोलने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर आपले स्वप्न साकार केले. पुण्यात आल्यावर वाणिज्य शाखेची पदवी घेत असतानाच त्याने चार्टर्ड अकांऊटन्सीच्या परीक्षेची तयारी सुरू केली होती.

शिरसाटवाडी (ता. इंदापूर, जि. पुणे) येथील दिग्विजय हा सीए होण्याचे ध्येय ठेवूनच उच्च शिक्षणासाठी पुण्यात आला. मराठवाडा मित्रमंडळ महाविद्यालयात वाणिज्य शाखेचे शिक्षण घेताना समितीच्या पी. डी. कारखानीस वसतिगृहात तो राहिला. समितीमुळे शिक्षणासाठी पोषक वातावरण, आधार आणि आत्मविश्वास तसेच जिवाभावाचे मित्र मिळाले, अशा भावना त्याने व्यक्त केली.

अनुभव

## आयुष्यातील सुवर्णाध्याय



डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ हा समितीतील वास्तव्याचा काळ माझ्या आयुष्यातील सुवर्णाध्याय आहे. आज मागे वळून पाहताना असे वाटते की, जर हा प्रवास केला नसता तर आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या शिकवणींपासून मी वंचित राहिलो असतो.

आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी कारण असते. कदाचित ही संधी माझ्या आयुष्यात आली, ती मला अधिक सक्षम बनविण्यासाठी, माझे नेतृत्व अधिक परिपक्व करण्यासाठी आणि एक माणूस म्हणून पुढील मोठ्या आव्हानांना तोंड देण्याकरिता तयार करण्यासाठी. विद्यार्थी विकास केंद्रातील या कार्याचीच पुण्याई असावी, की त्यानंतर मला केंद्र सरकारच्या दोन महत्त्वपूर्ण प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळाली. एवढेच नव्हे, तर सरकारच्या थिंक टॅंकमध्येही योगदान देता आले. या नव्या जबाबदाऱ्यांनी माझ्या विचारविश्वाला अधिक व्यापक केले आणि समाजपरिवर्तनाच्या मोठ्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा आत्मविश्वास दिला.

याच काळात शासन, विविध सामाजिक संस्था, उद्योग क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती आणि समाजजीवनातील अनेक घटक यांच्याबरोबर प्रत्यक्ष काम करण्याची व संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यामुळे विकासाच्या व्यापक प्रक्रियेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन लाभला आणि जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली. समितीतील वास्तव्याचा काळ केवळ काही उपक्रम राबविण्याचा नव्हता; तो माझ्या व्यक्तिमत्त्वाला नवा आकार देणारा, 'मी'पासून 'आपण'पर्यंतचा प्रवास घडविणारा आणि आयुष्यभरासाठी अमूल्य शिकवण देणारा सुवर्णाध्याय होता.

या प्रवासात साथ देणारे अध्यक्ष डॉ. मकरंद फडके सर, कार्यवाह डॉ. ज्योती गोगटे, सीमा होस्कुटे, सर्व वसतिगृह प्रमुख, सहकारी श्रद्धा माडव आणि विद्यार्थी विकास केंद्रातील प्रत्येक कार्यकर्ता यांच्याप्रति मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. कारण शेवटी उपक्रम यशस्वी होतात, ते एका व्यक्तीमुळे नाही, तर 'आपण' या भावनेने एकत्र आलेल्या संघामुळे.

विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला हा प्रवास आता समाज, शासन आणि राष्ट्रनिर्मितीच्या व्यापक कार्याशी जोडला गेला आहे आणि हीच या सुवर्णाध्यायाची सर्वात मोठी कमाई आहे.

**- प्रणय पाले,** माजी विद्यार्थी

मनोगत

## समिती एक पवित्र वास्तू



शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे, तर जगण्याची नवी दृष्टी मिळविणे आणि ही दृष्टी मला विद्यार्थी साहाय्यक समितीने दिली. सुरुवातीला एनसीसीच्या निमित्ताने पुण्यात सेनापती बापट रस्त्यावरून जायचे, तेव्हा समितीचे नाव ऐकून होते. ती वास्तू म्हणजे केवळ वसतिगृह आहे, असे वाटले होते. मात्र, नगरमधील कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात प्रवेश घेतला आणि माझा हा समज पूर्णपणे बदलला. हे केवळ एक हॉस्टेल नसून एक कुटुंब आहे, याचा प्रत्यय आला.

वसतिगृहात आल्यावर घरची आठवण येणे स्वाभाविक होते, पण इथे आईसारखी काळजी रेक्टर विद्या मॅडम यांनी घेतली. त्यांच्या शिस्तीत प्रेम होते आणि मार्गदर्शनात भविष्याची दिशा होती. आज जेव्हा मी समितीची विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाते, तेव्हा अभिमान वाटतो. समितीने जे मूल्यसंस्कार दिले, ते कधीच पुसले जाणार नाहीत. माझ्या नावापुढे जेव्हा माजी विद्यार्थिनी असे लिहिताना डोळे भरून येतात. माजी होणे म्हणजे केवळ संस्थेतून बाहेर पडणे नाही, तर त्या विचारांचा वारसा पुढे नेणे आहे. समिती ही माझ्यासाठी पवित्र वास्तू आहे. मी जिथे कुठे जाईन, तिथे समितीचे संस्कार माझ्यासोबत असतील.

**- प्रतिक्षा संगीता सुदाम रासकर,** अहिल्यानगर (एकच सत्र राहिलेली विद्यार्थिनी)

# ...आणि समिती झाले माहेर

तयाचा वेलू...



माझ्या आयुष्याचा प्रवास पूर्णतः स्वप्नवत आहे. सन १९८२ पर्यंत मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती, की मी शिकेन, नोकरी करेन, आर्थिक स्वातंत्र्याचा आनंद अनुभवेन. मी कधीही न पाहिलेले स्वप्न आता जगते आहे. यासारखे आत्मिक समाधान दुसरे असूच शकत नाही आणि हे आत्मिक सुख, समाधान मला समितीच्या पावन परिसस्पर्शाने लाभले आहे.

समितीच्या सान्निध्यात मी खऱ्या अर्थाने जगायला शिकले. आयुष्याच्या भयानक टर्निंग पॉईंटवर माझी वाचनाची आवड शिक्षणाच्या संधीत बदलली. सासऱ्यांनी दूरदृष्टीने मला घरी राहण्याऐवजी होस्टेलवर शिकायला ठेवले. पण काही कारणांमुळे त्यांना त्रासाला तोंड द्यावे लागले. म्हणून मी निश्चय केला, कोणाचीही मदत न घेता आपणच स्वतःच्या हिमतीवर शिकायचे. माझा हा निश्चय मला डॉ. मीरा सिद्धपाठक मॅडम यांच्या मदतीने समितीच्या दारात घेऊन आला आणि समिती माझे माहेर झाले.

समितीची शिस्त मला समितीबाहेर जीवन जगताना खूप उपयोगी ठरली. समितीत असताना पहाटे साडेचारला उठणे, साडेपाचची योगा बॅच घेणे, कमवा- शिका योजनेंतर्गत शिकवणी घ्यायला जाणे, कॉलेज आणि अभ्यास हे सर्व करता करता आराम माझ्यासाठी ' हराम ' होऊन गेला होता. याच सवयी नंतर नोकरी, घर, जबाबदाऱ्या सांभाळताना कायमस्वरूपी अंगवळणी पडल्या. 'कमवा- शिका'तून मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. या योजनेअंतर्गत रानडे सर, नाडकर्णी सरांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे लोकांशी संपर्क कसा साधायचा, हे शिकले. निर्मलाताई आणि गिंडी सरांनी विश्वासाने दिलेल्या रेक्टरपदाच्या जबाबदारीने मला आणखीनच ठाम बनवले. या कणखरपणाचा फायदा मला माझ्या वैयक्तिक आयुष्यात खूप झाला. कोणाचेही पाठबळ नसताना आपल्या जवळच्यांच्या विरोधात सुप्रीम कोर्टापर्यंत लढले आणि जिंकलेसुद्धा. एस.पी. कॉलेजच्या हॉस्टेलवर राहिले असते, तर फक्त एकटी राहायला शिकले असते. जगात वावरायला शिकले नसते.

व्हाईस रेक्टर, रेक्टरच्या कामामुळे मी समितीच्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात खूप वेळ राहिले. कार्यकर्त्यांचा निःस्वार्थ सेवाभाव, विद्यार्थ्यांबद्दलची तळमळ मला सगळ्यात जास्त भावली. आम्हा माजी विद्यार्थ्यांचे कार्यकर्ता म्हणून काम करणे, हे आमचे कर्तव्यच आहे. दुसऱ्यांसाठी आपला अमूल्य वेळ देऊन पोटतिडकीने काम करणे आणि घेतलेले काम निष्ठेने पूर्णत्वास नेणे, हे समितीच्या कार्यकर्त्यांचे वैशिष्ट्य. समितीचा हाच आदर्श मी माझ्या नोकरीच्या ठिकाणी ठेवला. कोणाचाही वरदहस्त नसताना पुणे जिल्हा शिक्षण मंडळात एकाच ठिकाणी २२ वर्षे टिकून राहिले, ही माझी कामावरची निष्ठा आणि प्रामाणिकपणाची पावती होती. याच निष्ठेने मला आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्कार देत गौरविले. हे सगळं साध्य झाले ते केवळ समितीच्या शिस्तीमुळे आणि संस्कारामुळेच.

मला कामाची अजिबात सवय नव्हती, पण मी समितीत सर्व शिकले. स्वकष्टार्जित दाल- आट्याचा भाव आणि चव मला समितीत राहिल्यामुळे कळली. मी स्वतःला कोणत्याही पुरुषापेक्षा एक काकणभरही कमी समजत नाही. मी आर्थिक स्वातंत्र्य अनुभवतेय, स्वाभिमानाने जगतेय, सन्मानाने राहतेय. हा सर्व समितीच्या शिस्तीचा प्रभाव आहे. समितीत जीवन जगण्याचे धडे शिकले. खूप छान मित्रमैत्रिणी मिळाल्या.

**- सुनंदा पाटील**

# योग दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

समितीमध्ये योगासने हा अनिवार्य उपक्रम असून रोज पहाटे अर्धा तास सर्व विद्यार्थी- विद्यार्थिनी योगासने करतात. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी सर्व वसतिगृहांमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'योगेन चित्तस्य पदेन वाचा' या प्रार्थनेने झाली. यावेळी शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यासाठी योगाचे असलेले महत्त्व सांगण्यात आले. योग हा निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवनशैलीचा पाया आहे, हे विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्यनमस्कार घातले. विविध योगासने आणि प्राणायाम केले.



# सकाळ विद्या एक्स्पोमध्ये समितीचा महिती स्टॉल

अहिल्यानगर येथे झालेल्या 'सकाळ विद्या' या एज्युकेशन एक्स्पोमध्ये लावलेल्या विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माहिती स्टॉलला अनेक विद्यार्थी व पालकांनी उत्सुकतेने भेट देत समितीच्या कार्याविषयी माहिती जाणून घेतली.

या स्टॉलच्या माध्यमातून समितीच्या विविध उपक्रमांची, वसतिगृहाची तसेच शैक्षणिक मदतीची सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रदर्शनात अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक नामांकित महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थां सहभागी झाल्या होत्या. यात विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रम, करिअरच्या संधी आणि उच्च शिक्षणाच्या पर्यायांबाबत उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. समितीच्या स्टॉलला भेट देणाऱ्यांना सौ. सुनिता झिंझाड यांनी समितीच्या कार्याची सविस्तर माहिती देत संस्थेच्या उपक्रमांची प्रभावी मांडणी केली. पर्यवेक्षक भगवान तुपे व रोहिणी भनगडे यांनी स्टॉलवरील नियोजन, व्यवस्थापन आणि मार्गदर्शन केले. समितीच्या अहिल्यानगरमधील दोन्ही वसतिगृहांतील विद्यार्थी- विद्यार्थिनींनी स्वयंसेवक म्हणून सक्रिय सहभाग घेत महत्त्वाची भूमिका बजावली.

